# मोजणी फी

जमिन मोजणी फी चे दर मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख,(म.राज्य) पुणे कार्यालया मार्फत निर्धारीत केले जातात. प्रचलित नियमाप्रमाणे शेतकऱ्यांसाठी व कंपन्या, इतर संस्था शेतकरी व्यतिरीक्त इतर बाबतीत भूसंपादन प्रकरणे व नगरभूमापन हद्दीतील जमिन मोजणी फी चे दर वेगवेगळे आहेत.

**शेतकऱ्यांचे शेत जमिनीसाठी मोजणी फी चे दर खालिल प्रमाणे आहे.**

## ***अ. साधारण मोजणी फी***

१. एक किंवा समान धारक शेतकऱ्यांचे (एक स.नं / ग.नं. / पो.हि.नं. / मंजुर रेखांकनातील एक भूखंडासाठी) २ हेक्टर मर्यादे पर्यंत र.रु.५००/- मात्र.

२. त्याच स.नं. / ग.नं. /पो.हि.नं. मधील २ हेक्टर पुढील उर्वरीत सर्व क्षेत्रासाठी / मंजुर रेखांकनातील पुढील प्रत्येक भूखंडासाठी र.रु.२५०/- मात्र.

३. जादा मोजणी करुन मागितलेली जमिन लगत नसल्यास वरील (अ) १ व २ नमुद केलेनुसार मोजणी फी आकारण्यात येईल.

## ***ब. तातडी मोजणी फी***

तातडी मोजणी फी चे दर साधारण मोजणी फी चे दुप्पट आकारणेत येईल.

## ***क. अतितातडी मोजणी फी***

अतितातडी मोजणी फी चे दर साधारण मोजणी फी चे तिनपट आकारणेत येईल.

## ***ड. पुनरभेट मोजणी फी***

मोजणी अर्जदार यांनी अर्ज करतेवेळी भरलेल्या मोजणीचे निम्मे (५०%) आकारणेत येईल.

सर्वसाधारणपणे साधी, तातडी व अतितातडी मोजणी फी भरलेल्या प्रकरणामध्ये अनुक्रमे ६, ३ व २ महामध्ये मोजणी कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे.

# कंपन्या, इतर संस्था, शेतकऱ्यांव्यतिरीक्त इतर बाबतीत व भूसंपादन प्रकरणाबाबत मोजणी फी

मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख,(म.राज्य) पुणे यांचे कडील परिपत्रक क्र./एल.आर.२२७/सी.आ३९२६/भू-३/२००१ दि.३०/१०/२००१ व दि.७/१/२००२ चे परिपत्रकान्वये निर्धारीत केलेल्या प्रमाणे आहे.

## नगरभूमापन मोजणी फी.

***अ. साधारण मोजणी फी***

१. नगरपालिका / महानगर पालिका क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस र.रु.१०००/- मात्र.

२. प्रत्येक लगत जादा मिळकतीस र.रु.५००/- मात्र.

३. वरील (१) मधील क्षेत्रा व्यतिरीक्त इतर क्षेत्राचे प्रत्येक मिळकतीस र.रु. ५००/- मात्र.

४. प्रत्येक जादा मिळकतीस र.रु. २५०/- मात्र.

**तातडी / अतितातडी मोजणी फी चे दर (ब) (क) मध्ये नमुद केल्या प्रमाणे राहील.**

## *निमताना मोजणी फी.*

१. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख / नगरभूमापन अधिकारी यांची निमताना मोजणी फी - अर्जदाराने भरलेल्या मोजणी फी चे तिनपट

२. अधीक्षक भूमी अभिलेख संवर्गातील अधिकाऱ्यापासुन करावयाची सूपर निमताना फी- अर्जदाराने भरणा केलेल्या मोजणी फी चे पाचपट आकारणेत येते.

## कोर्टवाटप / कोर्ट कमीशन फी.

२. कोर्ट वाटप / कोर्टकमीशन मोजणी कामी तातडी दराने मोजणी फी आकरणेत येईल.